# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों.क्र.२१०९६४/२१/अ.क्र.५८२८/२४**

श्री.संतोष विलास दौंडकर

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (प.ज.वा.) सी विभाग
सी विभाग कार्यालय इमारत, ७६, श्रीकांत पालेकर मार्ग,
चंदनवाडी, मरीनलाईन्स (पू.), मुंबई-४०० ००२.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सी विभाग
सी विभाग कार्यालय इमारत, ७६, श्रीकांत पालेकर मार्ग,
चंदनवाडी, मरीनलाईन्स (पू.), मुंबई-४०० ००२.

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०७-११-२०२४**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि.२९.१०.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे. |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित (प्रतिनिधी) |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ११-०१-२०२१ | -- | ०३-०२-२०२१ | २६-०२-२०२१ |

अपिलकर्तांनी माहिती अर्ज दि.११-०१-२०२१ अन्वये Provide information with attached documents regarding below mention period bills of House gully, Door to Door Garbage collection and Manning Mopping works by appointed NGO Contractor by AE (SWM) C-Ward. October, 2020 to December, 2020 माहितीची मागणी केलेली आहे.

जन माहिती अधिकारींनी उत्तर दिले नाही म्हणून प्रथम अपिल अर्ज दाखल केला.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता सी विभाग यांनी जन माहिती अधिकारींनी कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती अपिलकर्ताला ७ दिवसात विनाशुल्क उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले.

**क्र. मुमाआ/नों.क्र.२१०९६४/२१/अ.क्र.५८२८/२४**



अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दि.०४-०३-२०२१ नुसार जन माहिती अधिकारींनी माहिती दिली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपिल दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपिलकर्ता आणि प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित. जन माहिती अधिकारी तथा दुय्यम अभियंता (घ.क.व्य.) सी विभाग यांचे प्रतिनिधी सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) सी विभाग उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा दुय्यम अभियंता (घ.क.व्य.) सी विभाग यांचे प्रतिनिधी सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) सी विभाग यांनी दि.२१-०१-२०२१ रोजीचे पत्र सादर केले की, अपिलकर्ताला नस्ती निरीक्षणबाबत कळविले होते. तसेच त्यांनी अपिलकर्ताला दिनांक १९-०३-२०२१ रोजी माहिती दिली असल्याचे पत्र आयोगासमोर सादर केले आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारींनी अपिलकर्तांना माहिती दिलेली आहे. सबब, आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास
7-11-2024

State Information Commission
Maharashtra

**( डॉ.प्रदीप व्यास )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०७-११-२०२४**